**महावितरण**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**CIN : U40109MH2005SGC153645**

**मासं/रवका/न.क्र.५६९**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ७१३ दि. २० / ०८ / २०२६

**विषय:** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०२६ पासून सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर करणे व माहे जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या कालावधीतील थकबाकीची रक्कम अदा करणेबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय क्र.मभवा-१३२६/प्र.क्र.१६/सेवा-९ दि.१८.०८.२०२६.

*****

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मभवा-१३२६/प्र.क्र.१६/सेवा-९ दि.१८.०८.२०२६ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर दि.०१ जानेवारी २०२६ पासून ५८% वरून ६०% करण्यात आलेला आहे. तसेच माहे जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या कालावधीच्या थकबाकीची रक्कम माहे ऑगस्ट २०२६ च्या वेतनासोबत रोखीने अदा करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. या अनुषंगाने शासन निर्णय दि.१८.०८.२०२६ च्या धर्तीवर महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना ६०% या सुधारीत दराने महागाई भत्ता दि.०१ जानेवारी २०२६ पासून लागू करून दि.०१ जानेवारी २०२६ ते दि.३१ जुलै २०२६ पर्यंतची थकबाकीची रक्कम अदा करण्याकरीता सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे.

४. सबब, म.रा.वि.वि.कं.मर्या.मधील कर्मचाऱ्यांना ६०% अशा सुधारीत दराने महागाई भत्ता माहे ऑगस्ट २०२६ च्या वेतनापासुन अदा करण्यात यावा. तसेच, दि.०१ जानेवारी २०२६ ते दि.३१ जुलै २०२६ या कालावधीतील थकबाकीची रक्कम माहे ऑगस्ट २०२६ च्या वेतनासोबत देण्यात यावी. त्याचप्रमाणे, माजी कर्मचारी यांचे प्रकरणी महागाई भत्ता थकबाकीची रक्कम संबधीत कार्यालयाने गणना करून एम्प्लॉई पोर्टल मध्ये सादर केल्यावर अदा करण्यात येईल.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** शासन निर्णय दि.१८.०८.२०२६.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रति,**

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जानेवारी, २०२६ पासून सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मभवा-१३२६ /प्र. क्र.१६/सेवा-९**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२६

वाचा - भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग कार्यालयीन ज्ञापन क्रमांक: १/१(i)/ २०२६-E.II (B), दिनांक २२ एप्रिल, २०२६.

**शासन निर्णय** :-

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०२६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५८% वरुन ६०% करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ ७ महिन्यांच्या ( माहे जानेवारी, २०२६ ते जुलै, २०२६ या कालावधीतील ) थकबाकीसह माहे ऑगस्ट महिन्याच्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहतील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१८१८०३४८४९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SUNITA AJAY HAZARI
Date: 2026.08.18 18:05:33 +05'30'

**( सुनिता. अ. हजारी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
४. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
७. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
८. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
११. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
१२. सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
१३. सर्व मंत्रालयीन विभाग
१४. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२३. राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
२४. सर्व विभागीय आयुक्त
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
२७. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३१. सर्व कोषागार अधिकारी
३२. लेखाधिकारी, सर्व वेतन पडताळणी पथके,मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
३३. मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३४. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर
३५. कुलसचिव, सर्व कृषि आणि कृषितर विद्यापीठे
३६. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई
३७. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती नागपूर
३८. बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१

३९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४
४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
४२. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
४३. नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट,मुंबई-२१
४४. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
४५. वित्त विभागातील सर्व कार्यासने
४६. निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)